ePaper

**पंतप्रधान निवासाजवळ मोठी कारवाई, 3 झोपडपट्ट्यांतील 717 घरांना नोटीस**

वर्ष - 9 । अंक - 176 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 21 फेब्रुवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 2 वरुन...

धक्कादायक! शाळकरी मुलीवर बलात्कार

## नेहा सिंह यांच्या नोकरीवर गदा? गलगोटिया विद्यापीठाने काय म्हटलं?

# चीनच्या रोबोडॉगवरून वाद!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**दिल्लीतील इंडिया एआय इम्पॅक्ट समिटमध्ये चिनी रोबोडॉगला स्वतःचं म्हणून सादर केल्यामुळे नोएडामधील गलगोटिया विद्यापीठाला चांगलंच महागात पडलं आहे. यावरून गलगोटिया विद्यापीठावर मोठ्या प्रमाणात टीका होत आहे. एवढंच नाही तर या विद्यापीठाबाबत अनेक सवाल उपस्थित करण्यात येत आहेत.**



चीनच्या रोबोडॉगवरून झालेल्या वादाचं खापर गलगोटिया विद्यापीठाने प्राध्यापकांवर फोडलं. गलगोटिया विद्यापीठाचं म्हणणं आहे की, 'एका प्रतिनिधीने कॅमेऱ्यासमोर बोलण्याच्या उत्साहात ही खोटी माहिती दिली. माध्यमांशी बोलणाऱ्या कर्मचाऱ्याला अशा प्रकारची चुकीची माहिती देण्याचा अधिकार नव्हता.'


या प्रकरणात आता प्राध्यापक नेहा सिंह यांच्या नोकरीवर गदा आल्याची चर्चा सुरू आहे. या चर्चांचं कारण म्हणजे नेहा सिंह यांनी त्यांच्या 'लिंक्ड-इन'वरील 'ओपन टू वर्क' अशा स्टेटसमुळे सोशल मीडियावर या चर्चा रंगल्या आहेत. प्राध्यापक नेहा सिंह यांच्यावर विद्यापीठाकडून कारवाई करण्यात येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यावर आता गलगोटिया विद्यापीठाने स्पष्टीकरण दिलं आहे.

गलगोटिया विद्यापीठाचे रजिस्ट्रार नितीन कुमार गौर यांनी या संदर्भात बोलताना म्हटलं की, "आम्ही (गलगोटिया विद्यापीठ) आधीच स्पष्टीकरण दिलं आहे की, ही एक चूक होती. आम्हाला त्याबद्दल खेद आहे. विद्यापीठाची किंवा देशाची प्रतिमा खराब व्हावी असा आमचा उद्देश नव्हता. पण आम्ही उर्वरित गोष्टींची निश्चितपणे चौकशी करणार आहोत. ही चूक का झाली? ते आम्ही तपासणार आहोत आणि अशी चूक पुन्हा होणार नाही यासाठी उपाययोजना करणार आहोत", असं ते म्हणाले.

प्राध्यापक नेहा सिंह यांच्यावरील कारवाईबाबत बोलताना रजिस्ट्रार नितीन कुमार गौर यांनी म्हटलं की, "त्यांना निलंबित करण्यात आलेलं नाही. पण जोपर्यंत अशी चूक का झाली? याची संपूर्ण चौकशी होत नाही तोपर्यंत कार्यवाही सुरू राहील. मात्र, एका व्यक्तीच्या चुकीमुळे संपूर्ण विद्यापीठाची चौकशी केली जाऊ नये. आम्ही देखील भारताचे नागरिक आहोत आणि आम्हाला निश्चितपणे आपला देश पुढे जावा असं वाटतं", असं त्यांनी म्हटलं आहे.

## कोण आहेत नेहा सिंह?

नेहा सिंह या स्वतःचा परिचय गलगोटियास विद्यापीठाच्या स्कूल ऑफ बिझनेस विभागातील 'हेड ऑफ डिपार्टमेंट – कम्युनिकेशन्स' असा करून देतात. भाषेवरील प्रभुत्व आणि सार्वजनिक मंचावरील उपस्थिती या कौशल्याच्या जोरावर इतरांना प्रेरणा देण्याची क्षमता आपल्याकडे असल्याचे त्यांनी लिंक्डइन प्रोफाईलमध्ये नमूद केले आहे. नेहा सिंह यांनी २००६ मध्ये देवी अहिल्या विश्वविद्यालयामधून एमबीएचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर अलाहाबाद विद्यापीठातून त्यांनी वाणिज्य शाखेची (बी.कॉमची) पदवी घेतली. २०२३ मध्ये नेहा यांनी गलगोटियास विद्यापीठात प्राध्यापक म्हणून कामाला सुरुवात केली. त्यापूर्वी ग्रेटर नोएडातील शारदा विद्यापीठात त्यांनी सहाय्यक प्राध्यापक या पदावर काम केले. नेहा सिंह यांचे नाव 'गीतम' संस्थेशीही जोडले गेले आहे.



## नेमका वाद काय?

दिल्लीतील 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट' या कार्यक्रमात गलगोटियास विद्यापीठातील प्रतिनिधींनी काही वस्तूंच्या सादरीकरणासाठी मंडप लावला होता. यादरम्यान एका रोबोटिक डॉगचे प्रात्यक्षिक दाखवताना नेहा सिंह दिसून आल्या. सदरील रोबोटिक डॉग हा गलगोटियास विद्यापीठाच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये विकसित केल्याचा दावा नेहा यांनी केला. त्यांचा हा व्हिडीओ समाजमाध्यमांवर वाऱ्याच्या वेगाने व्हायरल झाला. केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानेही आपल्या अधिकृत अकाउंटवरून या रोबोटचे व्हिडीओ शेअर केले. त्यानंतरच्या काही तासांतच नेटकऱ्यांनी या रोबोटिक डॉगची पोलखोल करण्यास सुरुवात केली. सदरील रोबो हा चिनी बनावटीचा असून तो सुमारे १,६०० डॉलर्सना (साधारण २-३ लाख रुपये) बाजारात विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे अनेकांनी सांगितले.

# धक्कादायक! शाळकरी मुलीवर बलात्कार

## वारजे माळवाडी पोलिसांकडून एका २९ वर्षीय तरुणाविरुद्ध गुन्हा

**महाईन्यूज । पुणे**

**शाळेत सोडण्याची बतावणी करुन अल्पवयीन मुलीवर मोटारीत बलात्कार करण्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या प्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी हा शाळकरी मुलीच्या ओळखीतील आहे. या प्रकरणी एका २९ वर्षीय तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अल्पवयीन मुलीच्या आईने वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हा शाळकरी मुलीच्या ओळखीचा आहे. त्याची पीडित मुलीच्या आईशी ओळख होती. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी पावणेसातच्या सुमारास अल्पवयीन मुलीला मोटारीतून शाळेत सोडतो, असे सांगून तिला आरोपीने नेले. कर्वेनगर भागातील डीपी रस्त्यावर त्याने मोटार थांबविली. मोटारीत त्याने मुलीला धमकावून बलात्कार केला. हा प्रकार कोणाला सांगितल्यास त्याने मुलीला जिवे मारण्याची धमकी दिली. घाबरलेल्या मुलीने याबाबतची माहिती आईला दिली.

त्यानंतर आरोपीविरुद्ध बलात्कार, तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायद्यान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला.

### बलात्कार, विनयभंगाच्या गुन्ह्यात वाढ

गेल्या वर्षी पुणे शहरातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात बलात्काराचे ४७३ गुन्हे, तसेच विनयभंगाचे ८३६ गुन्हे दाखल झाले. या गुन्ह्यांच्या आकडेवारीचा विचार केल्यास स्वारगेट एसटी स्थानकाच्या आवारातील महिला प्रवाशावरील बलात्काराचा गुन्हा वगळता अन्य सर्व गुन्हे ओळखीतील आरोपींनी केल्याचे निदर्शनास आले आहे. महिला, ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारी त्वरीत नोंदवून घेणे, तसेच बालकांवरील अत्याचाराच्या घटनांची नोंद घेण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी दिले आहे.

### हडपसरमध्ये महाविद्यालयीन युवतीचा विनयभंग

हडपसर भागात महाविद्यालयीन युवतीचा विनयभंग केल्या प्रकरणी पोलिसांनी एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला. या प्रकरणी एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत युवतीने हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अल्पवयीन युवती महाविद्यालायत जात असताना आरोपी तिचा पाठलाग करायचा. तू मला आवडते, असे सांगून त्याने युवतीला अडवले. युवतीला तो त्रास द्यायचा. त्याच्या त्रासामुळे युवतीने नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस उपनिरीक्षक कोलेवाड तपास करत आहेत.

# तिजोरीत खडखडाट तरी जाहिरात शुल्कवाढ प्रस्ताव मागे

**महाईन्यूज । पुणे**

**शहरात लावण्यात येत असलेल्या जाहिरात फलकांच्या परवाना शुल्कवाढीचे दोन प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मागे घेण्याची नामुष्की पहिल्या सर्वसाधारण सभेतच प्रशासनावर आली. उपसूचना देऊन हे प्रस्ताव मागे घेण्याची विनंती प्रशासनाने सभागृहाला केली. त्याला मान्यतादेखील देण्यात आली.**




महापालिका प्रशासनाने घेतलेल्या भूमिकेवर आक्षेप नोंदवून काँग्रेसने प्रस्ताव मागे घेण्याचे स्पष्टीकरण देण्याची मागणी केली. न्यायालयाने निश्चित केलेल्या आणि महापालिका प्रशासनाने यापूर्वी प्रस्तावात दिलेल्या दरामध्ये कपात करून नवीन प्रस्ताव ठेवू नका, असेही काँग्रेसच्या सभासदांनी प्रशासनाला सुनावले. मात्र त्यावर कोणताही खुलासा महापालिका आयुक्तांनी केला नाही.

महापालिकेच्या उत्पन्नात वाढ व्हावी तसेच बेकायदा पद्धतीने रस्त्यांवर, पदपथांवर जाहिरात फलक लावणाऱ्यांना आळा बसावा, यासाठी महापालिका प्रशासन विविध उपाययोजना करीत आहेत. महापालिका प्रशासनाने जाहिरात फलक नियमन व नियंत्रण नियमांनुसार परवाना शुल्कात वाढ सुचवली होती. सध्या २२२ रुपये प्रति चौरस फूट असलेला जाहिरात फलकांचा दर ५८० ते ७०० रुपयांपर्यंत नेण्याचा प्रस्ताव होता.

प्रशासनाने ठेवलेल्या पहिल्या प्रस्तावानुसार २०२३ ते २०२६ या कालावधीत ५८० रुपये दर लागू करायचा होता, तर दुसऱ्या प्रस्तावात २०२६ ते २०२९ या कालावधीत ७०० रुपये दर निश्चित करण्याची तरतूद होती. मात्र, सभागृहात हे दोन्ही प्रस्ताव उपसूचना देऊन महापालिका प्रशासनाकडून मागे घेण्यात आले.

महापालिका प्रशासनाने विषयपत्रात तांत्रिक व प्रशासकीय स्वरूपाच्या दुरुस्त्या आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे, असे कारण देऊन विषय मागे घेण्यात आल्याचे कारण दिले. मात्र, प्रशासनाच्या भूमिकेवर काँग्रेसचे नगरसेवक अरविंद शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली. यावर बोलताना अरविंद शिंदे म्हणाले, ‘नेमकी तांत्रिक अडचण काय आहे, हे आयुक्तांनी स्पष्ट केले पाहिजे. जाहिरात फलकांच्या दरासाठी उच्च न्यायालयाने ५८०, ६४० आणि ७०० रुपये दरांना मान्यता दिली आहे.

त्यामुळे या प्रस्तावात दुरुस्ती करताना न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहूनच करावी लागेल. त्यामध्ये इतर बदल करण्याचा अधिकार प्रशासनाला नाही. मात्र, याकडे दुर्लक्ष करून हा प्रस्ताव मागे घेण्यास मान्यता देण्यात आली.’

दरम्यान, अनधिकृत बोर्ड, बॅनर आणि फ्लेक्सवरील दंडवाढीचा प्रस्ताव मात्र चर्चेविना पुढे ढकलण्यात आला. सध्या अनधिकृत फ्लेक्ससाठी १ हजार रुपये दंड आणि अनधिकृत जाहिरात फलक काढण्यासाठी ५० हजार रुपये शुल्क आकारले जाते. नव्या प्रस्तावानुसार हा दंड १० हजार रुपये, तर निष्कासन शुल्क २ लाख रुपये करण्याची तरतूद आहे. या प्रस्तावावर पुढील महिन्याच्या सर्वसाधारण सभेत सविस्तर चर्चा होणार आहे.

# महानगरपालिकेच्या विविध समित्यांच्या सदस्यांची नियुक्ती

## स्थायी, विधी, शिक्षणसह महत्त्वाच्या समित्यांवर भाजप, राष्ट्रवादीची वर्णी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये विविध समित्यांचे सदस्य नियुक्त करण्यात आले आहेत. यामध्ये प्रामुख्याने स्थायी समिती, विधी समिती, शहर सुधारणा समिती, क्रीडा कला साहित्य व सांस्कृतिक समिती, शिक्षण समिती, महिला व बालकल्याण समिती या महत्त्वाच्या समित्यांवर विविध पक्षांचे सदस्य यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये भाजप, राष्ट्रवादी व शिवसेना पक्षाच्या सदस्यांची वर्णी लागली आहे.**




### विधी समितीमधील सदस्यांची नावे

ज्ञानेश्वर जगताप (भाजप), विनायक गायकवाड (भाजप), कुंदा भिसे (भाजप), सुजाता बोराटे (भाजप), श्रुती डोळस (भाजप), कुशाग्र कदम (भाजप), शेखर चिंचवडे (राष्ट्रवादी), वर्षा जगताप (राष्ट्रवादी), तुषार सहाणे (राष्ट्रवादी).

### स्थायी समितीमधील सदस्यांची नावे

अभिषेक बारणे (भाजप), शालिनी गुजर (भाजप), मनिषा चिंचवडे (भाजप), संदीप कस्पटे (भाजप), सारीका गायकवाड (भाजप), योगिता नागरगोजे (भाजप), कृष्णा सुरकुले (भाजप), शीतल वर्नेकर (भाजप), अर्चना करांडे (भाजप), मधुरा शिंदे (भाजप), बाबासाहेब त्रिभुवन (भाजप), सविता आसवानी (राष्ट्रवादी), संतोष कोकणे (राष्ट्रवादी), संदीप वाघेरे (राष्ट्रवादी), विकास साने (राष्ट्रवादी), सुलभा उबाळे (शिवसेना).

### क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीमधील सदस्यांची नावे

कैलास कुटे (भाजप), शाम जगताप (भाजप), तानाजी बारणे (भाजप), धर्मपाल तंतरपाळे (भाजप), उदय गायकवाड (भाजप), योगेश लांडगे (भाजप), भाऊसाहेब भोईर (राष्ट्रवादी), जितेंद्र ननावरे (राष्ट्रवादी), प्रमोद कुटे (राष्ट्रवादी).

### शहर सुधारण समितीमधील सदस्यांची नावे

अर्चना सस्ते (भाजप), विनोद नढे (भाजप), कुणाल वाव्हळकर (भाजप), संजय (नाना) काटे (भाजप), सुहास कांबळे (भाजप), उत्तमराव केंदळे (भाजप), डॉ. वैशाली घोडेकर – लोंढे (राष्ट्रवादी), अनंत कोऱ्हाळे (राष्ट्रवादी), वैशाली काळभोर (राष्ट्रवादी).

### महिला व बालकल्याण समितीमधील सदस्यांची नावे

पल्लवी जगताप (भाजप), नीता पाडाळे (भाजप), रेश्मा भुजबळ (भाजप), शिवानी नरळे (भाजप), राणी पठारे (भाजप), सुप्रिया चांदगुडे (भाजप), निकिता कदम (राष्ट्रवादी), सारिका मासूळकर (राष्ट्रवादी), मनिषा लांडे (राष्ट्रवादी).

### शिक्षण समितीमधील सदस्यांची नावे

पल्लवी वाल्हेकर (भाजप), श्रुती वाकडकर (भाजप), रविना अंघोळकर (भाजप), कविता भोंगाळे (भाजप), रीटा सानप (भाजप), सारिका बोऱ्हाडे (भाजप), प्रियांका कुदळे (राष्ट्रवादी), योगिता बारणे (राष्ट्रवादी), यश साने (राष्ट्रवादी).

# निगडी जलशुद्धीकरण केंद्र दुरुस्तीसाठी सोमवारी पाणीपुरवठा बंद

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत से.क्र. २३ येथील स्थापत्य व विद्युत विषयक कामे तसेच क्षेत्रीय स्तरावरील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेतील स्थापत्य व विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहेत. या कामांसाठी सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी निगडी जलशुद्धीकरण केंद्रावरून होणारा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे.**



> पाणी पुरवठा बंद कालावधीत नागरिकांनी मनपाकडील उपलब्ध पाण्याचा पुरेसा साठा करून पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. देखभाल दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी महानगरपालिका प्रशासन प्रयत्नशील असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.पाणीपुरवठ्यातील या तात्पुरत्या अडचणीसाठी नागरिकांनी समजून घेऊन मनपास सहकार्य करावे.
>
> – विक्रांत बगाडे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

पिंपरी-चिंचवड शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेत कोणताही खंड पडू नये, यासाठी वेळोवेळी पाणीपुरवठा यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक असते. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत से.क्र. २३ येथील स्थापत्य व विद्युत विषयक कामे तसेच क्षेत्रीय स्तरावरील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेतील स्थापत्य व विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

या कामांसाठी सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी निगडी जलशुद्धीकरण केंद्रावरून होणारा पाणीपुरवठा बंद ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे सोमवार, दिनांक २३/०२/२०२६ रोजी पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व भागांचा संध्याकाळचा पाणीपुरवठा पूर्णतः बंद राहणार आहे.

तसेच या कामांचा परिणाम म्हणून दुसऱ्या दिवशी मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळचा पाणीपुरवठा अनियमित व कमी दाबाने होण्याची शक्यता आहे. नागरिकांनी या बाबीची नोंद घ्यावी, असे आवाहन महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे.



## भूमिका

**“उंटाच्या बुडख्याचा मुका घेऊ नये” हा ग्राम्य सल्ला काही प्रसंगी अचूक ठरतो. राजधानीतील एआय प्रज्ञावंतांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत गलगोटियास नावाच्या विद्यापीठाने केलेला प्रकार पाहता तोच अनुभव आला. आपल्या शैक्षणिक उंचीचे भान नसताना जागतिक व्यासपीठावर केलेल्या उथळ मांडणीमुळे देशाची नाचक्की झाली.**

# शिक्षणाचे गालगोटियाकरण आणि राष्ट्रीय नाचक्की

एरवी अशा दर्जाहीन संस्थांकडे दुर्लक्ष करणे योग्य ठरले असते; कारण देशात अशा विद्यापीठांची कमी नाही. तरीही या घटनेची दखल घेणे आवश्यक आहे.

यामागे तीन प्रमुख कारणे आहेत. पहिले म्हणजे, आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे हसे झाले. जगभरातील तज्ज्ञ राजधानीत एकत्र आले असताना आपल्या प्रतिनिधित्वाने देशाची अब्रू घातली. दुसरे म्हणजे, या प्रकरणावर चीनने उघडपणे टीका केली. आधीच तणावपूर्ण संबंधांच्या पार्श्वभूमीवर चीनकडून झालेली खिल्ली अधिक वेदनादायी ठरली. सलग चर्चांमध्ये या विद्यापीठाची थट्टा होत राहिली आणि आपण असहाय्यपणे पाहत राहिलो. तिसरे कारण अधिक खंतावणारे—भारताच्या ‘सर्वम’सारख्या गुणवत्तापूर्ण एआय उपक्रमावर या प्रकाराने




सावली टाकली; सकारात्मक काम झाकोळले गेले आणि नकारात्मकतेचीच चर्चा रंगली.

हे घडण्यामागे शिक्षणक्षेत्राकडे सातत्याने झालेले दुर्लक्ष कारणीभूत आहे. आज अनेक विद्यापीठांतून स्वतंत्र विचारांचे प्रज्ञावंत घडण्याऐवजी आज्ञाधारक कार्यकर्ते तयार होतात. ज्यांच्याकडे स्वतंत्र बौद्धिक क्षमता असते ते परदेशात जाऊन आपली गुणवत्ता सिद्ध करतात. पूर्वीच्या नामांकित संस्थांत शिक्षण गांभीर्याने घेतले जाई; स्वतंत्र विचार, संशोधन आणि वैचारिक प्रामाणिकता यांना प्रतिष्ठा होती. त्या काळात घडलेले विद्यार्थी जागतिक स्तरावर पोहोचले.

मात्र पुढे शिक्षणाचा पोत बदलत गेला. शिक्षणसम्राटांनी बाजार मांडला आणि ‘गप्प बसा’ संस्कृतीला खतपाणी घातले. मूलभूत संशोधनाचे महत्त्व कमी झाले; उपयोजित शिक्षणालाच जीवनावश्यक मानले गेले. माहिती तंत्रज्ञानाच्या विस्तारकाळात भारताने मोठ्या प्रमाणावर आयटी अभियंते तयार केले; परंतु स्वतंत्र, जागतिक दर्जाचे उत्पादन उभे करण्याची महत्त्वाकांक्षा कमी पडली. सेवा क्षेत्रात मोठी उपस्थिती निर्माण झाली, पण नवसर्जन आणि बौद्धिक नेतृत्वात आपण मागे पडलो.

विद्यापीठीय वातावरणातही लक्षणीय बदल झाला. मतभिन्नता म्हणजे द्रोह अशी समज वाढू लागली. वैचारिक खंडन-मंडनाची परंपरा आटत गेली. “आपल्याकडे हे सर्व आधीपासूनच होते” या भूतकाळपूजक भूमिकेमुळे वर्तमानातील प्रश्नांवर चिकित्सक चर्चा कमी झाली. परिणामी स्वतंत्र वैचारिकतेची वाट अधिकच अरुंद झाली. अशा पार्श्वभूमीवर शिक्षणाची दुकाने थाटणाऱ्या संस्थांना विद्यापीठाचा दर्जा मिळाला. तासिका तत्त्वावर शिकवणाऱ्यांना ‘प्राध्यापक’ ही पदवी देण्यात आली आणि शिक्षणाच्या संकल्पनेचे अवमूल्यन झाले.

हास्यास्पद प्रबंध, दिशाहीन उपक्रम आणि राजकीय दिखावे यामुळे बौद्धिक पातळी खालावली. अशा संस्थांना प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय परिषदेत स्थान मिळणे ही व्यवस्थेतील शिथिलतेची साक्ष आहे. नंतर दोष इतरांवर ढकलण्याचा प्रयत्न हा निर्लज्जपणाच म्हणावा लागेल.

अशा घटना टाळायच्या असतील तर शिक्षणाकडे अराजकीय, अधार्मिक आणि पूर्वग्रहशून्य दृष्टीने पाहणे अत्यावश्यक आहे. स्वतंत्र विचार, मूलभूत संशोधन आणि बौद्धिक प्रामाणिकता यांना पुन्हा प्रतिष्ठा मिळाली तरच समाजाचे ‘गालगोटियाकरण’ थांबेल. अन्यथा नाचक्कीचे नवे अध्याय आपल्या नावावर जमा होत राहतील आणि आपणच त्याचे साक्षीदार राहू.

## प्रासंगिक »

### खरे रूपांतर श्रेष्ठ

***एकदा एक मुंगी आपले खाद्य शोधत फिरत असता कोशातून नुकताच एक किडा बाहेर पडलेला तिला दिसला.***

ते पाहून मुंगी म्हणाली, ‘अरेरे, काय ही तुझी स्थिती ? मला वाटेल तिकडे फिरता येतं. पण तुला या कोशात बंदीवान होऊन दिवस काढावे लागतात. तेव्हा तुझ्या व माझ्या स्थितीत फारच अंतर आहे असं म्हटले पाहिजे.’ यावर किडा काहीच बोलला नाही. पुढे काही दिवसांनी ती मुंगी पुनः तेथे गेली असता त्या किड्याचे फक्त कवच मात्र तेथे पडले असून तो किडा कोठेतरी निघून गेला आहे असे तिला दिसते. ती इकडे तिकडे फिरत आहे तोच एक सुंदर पतंग आपल्या पंखांनी तिला वारा घालत असताना तिला दिसला. तो तिला म्हणाला, ‘अग, त्या दिवशी बंदिवान म्हणून तू माझी कीव करीत होतीस, माझ्यापेक्षा तुझी स्वतःची स्थिती बरी असं म्हणत होतीस, तोच कोशातला किडा मी आहे हे लक्षात घे. आपल्याला वाटेल तिकडे फिरता येतं अशी बढाई मारायची असेल तर खुशाल मार. तोपर्यंत मी सहज थोडा आकाशात फिरून येतो.’ इतके बोलून त्याने एक भरारी मारली व उंच आकाशात गेला.

तात्पर्य- आजचा दुर्बळ उद्या समर्थ होऊ शकतो; म्हणून कोणाचीही थट्टा करू नये.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने महाराष्ट्रातल्या सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्रात आठ पट्टेरी वाघांचे स्थलांतरण करण्याला अनुमती देऊन, त्याची अंमलबजावणी आरंभल्याने देशभरातल्या वन्यजीव अभ्यासकांचे या घटनेने लक्ष वेधून घेतलेले आहे.

# सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्रांतले वाघांचे स्थलांतरण

सह्याद्रीत गेल्या काही दशकांत वाघांची संख्या फारच कमी झाली होती, त्यामुळे त्यांच्या पुनर्स्थापनाची गरज भासत होती.

सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्राची निर्मिती 2010 साली महाराष्ट्रातील सातारा, कोल्हापूर, सांगली आणि रत्नागिरी या चार जिल्ह्यांत करण्यात आली होती. यामध्ये चांदोली राष्ट्रीय उद्यान आणि कोयना अभयारण्यासारखे संरक्षित वनक्षेत्र समाविष्ट आहेत. या 1165 चौरस किलोमीटर क्षेत्रात बिबटे, गवे, हरणे व इतर जंगली प्राणी आहेत, पण पट्टेरी वाघ लंबे काळापासून दुर्लभ झाले होते. राजे-सरदारांच्या शिकार आणि निसर्गापेक्षा मानवकेंद्रित विकासाला प्राधान्य दिल्यामुळे वाघांचे अस्तित्व हळूहळू घटले.

पूर्वी 1974 मध्ये भारताने नऊ व्याघ्र राखीव क्षेत्रे निर्माण केली होती, त्यात मेळघाट व्याघ्र राखीव क्षेत्राचा समावेश होता. परंतु सह्याद्रीतल्या वाघांचा इतिहासजमा होण्याच्या वाटेवर असताना, सातारा, सांगली, कोल्हापूर व रत्नागिरी या भागात वाघांचे संवर्धन करण्याची तातडीची गरज निर्माण झाली होती. 2000 साली गोवा, महाराष्ट्र व कर्नाटकमधील पर्यावरण




कार्यकर्त्यांनी सह्याद्रीला पर्यावरणीय संवेदनाक्षम क्षेत्र म्हणून संरक्षित करण्याचे प्रस्ताव केंद्र शासनास मांडले, पण त्याकडे गांभीर्याने लक्ष दिले गेले नाही.

वन्यजीवांच्या नैसर्गिक अधिवासाला आणि वाघांच्या भ्रमणमार्गाला सुरक्षित ठेवण्यासाठी हे व्याघ्र क्षेत्र महत्त्वाचे आहे. कॅमेरा ट्रॅपमध्ये मिळालेल्या पुराव्यानुसार म्हादई (गोवा) पासून सह्याद्री ते कर्नाटकातील काळी पर्यंत वाघांचे मार्ग आहेत, त्यामुळे हा मार्ग विकासाच्या प्रकल्पांपासून मुक्त ठेवणे आवश्यक आहे.

पेय-सिंचन जलासाठी धरणे, महामार्ग, रेल्वे, औद्योगिक प्रकल्पांसाठी जमीन बदलणे आणि पैशासाठी बागायती पिकांसाठी जंगले नष्ट होणे यामुळे वनक्षेत्र बिघडले आहे. त्यामुळे वन्यजीव-मानव संघर्ष वाढत आहे. अशा परिस्थितीत पट्टेरी वाघांचे स्थलांतरण करणारा हा निर्णय सह्याद्रीतील वाघसंख्येला वाढ देण्याची शक्यता आहे.

स्थानांतरात आठ वाघांना सामील केले जाणार आहे—तिन महिला व पाच नर. आतापर्यंत सुभेदार, बाजी आणि सेनापती (नर) तसेच चंदा, तारा आणि हिरकणी (मादी) यांच्या स्थलांतराची प्रक्रिया झाली आहे. यामुळे वाघांची संख्या वाढण्याची अपेक्षा असली, तरी त्यांच्या कातडी, नखे व इतर भागांसाठी तस्करी करणाऱ्या टोळ्यांचे धोकादायक हालचाली दिसत आहेत.

स्थानिक परिसरात बिबटे व इतर प्राण्यांच्या शिकारासाठी सापळे लावणाऱ्या टोळ्यांचा प्रबळ परिणाम जाणवतो. त्यामुळे हे षड्यंत्र थांबवण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी व व्याघ्र संरक्षण दलाची नियुक्ती करणे आवश्यक आहे. स्थलांतरित वाघांचा वावरणा जिथे असेल तिथल्या स्थानिकांच्या गुरे-ढोरे सुरक्षित ठेवणे, हल्ल्यांमध्ये झालेल्या नुकसानीसाठी नुकसानभरपाईची तरतूद करणे आणि पुरेसा प्राण्यांचा खानावळ उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

## ।। अभंगवाणी ।।



गरुडाचें वारिकें कासे पीतांबर ।
सांवळें मनोहर कैं देखेन ॥१॥

बरवया बरवंटा घनमेघ सांवळा ।
वैजयंतीमाळा गळां शोभे ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# नागपूर-चंद्रपूर द्रुतगती महामार्गाला ग्रीन सिग्नल

## विकासाला चालना; २०४ किमी मार्गामुळे विदर्भातील कनेक्टिव्हिटी मजबूत

**महाईन्यूज । मुंबई**

**नागपूर – मुंबई समृद्धी महामार्गाचा विस्तार नागपूर – चंद्रपूर असा करण्यात येणार आहे. राज्य सरकारच्या निर्देशानुसार या महामार्गाच्या संरेखनात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) काही बदल केले होते. त्यानुसार सुधारित संरेखनाचा प्रस्ताव राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता. या प्रस्तावाला राज्य सरकारने मान्यता देऊन संरेखन अंतिम केले. यासंबंधीचा शासन निर्णय शुक्रवारी प्रसिद्ध करण्यात आला.**



या प्रस्तावाला राज्य सरकारने मान्यता देऊन संरेखन अंतिम केले. यासंबंधीचा शासन निर्णय शुक्रवारी प्रसिद्ध करण्यात आला. या शासन निर्णयानुसार आता नागपूर – चंद्रपूर द्रुतगती महामार्ग २०४.७९९ किमी लांबीचा असणार आहे. सुधारित संरेखनाला मान्यता देतानाच राज्य सरकारने या प्रकल्पासाठीच्या भूसंपादनासाठी लागणाऱ्या २,३५३.९४ कोटी रुपयांच्या खर्चालाही प्रशासकीय मान्यता दिली. त्यामुळे या प्रकल्पाचा मार्ग मोकळा झाला असून लवकरच बांधकामासाठी निविदा काढण्यात येणार आहे.

समृद्धी महामार्गाचा विस्तार विदर्भात नागपूर – चंद्रपूर, नागपूर – गोंदिया आणि भंडारा – गडचिरोली असा करण्यात येणार आहे. या तिन्ही महामार्गांच्या बांधकामासाठी एमएसआरडीसीने निविदा प्रक्रिया राबविली होती. मात्र भूसंपादन प्रक्रिया पूर्ण होण्यास बराच वेळ लागणार असल्याने ही निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली. भूसंपादन पूर्ण झाल्यानंतरच नव्याने निविदा काढण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, नागपूर – चंद्रपूर द्रुतगती महामार्गाला पर्यावरणासंबंधी परवानगी मिळाली होती. मात्र या प्रकल्पात बाधित होणाऱ्या वनक्षेत्रात घट करता येईल का, याचा विचार करून सुधारित संरेखन तयार करण्याचे निर्देश राज्य सरकारने दिले होते. त्यानुसार एमएसआरडीसीने संरेखनात बदल करून यासंबंधीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे मान्यतेसाठी पाठवला होता. या प्रस्तावास मान्यता देऊन शुक्रवारी शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला.

या शासन निर्णयानुसार २०४.७९९ किमी लांबीच्या या महामार्गात ११.९६९ किमी लांबीचा चंद्रपूर जोडरस्ता समाविष्ट आहे. नागपूर – चंद्रपूर द्रुतगती महामार्गासाठीच्या भूसंपादनासाठी १,४९३.३१ कोटी रुपये आणि ८६०.६३ कोटी रुपयांच्या संभाव्य व्याजासह एकूण २,३५३.९४ कोटी रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार आता हुडकोकडून कर्ज घेण्याचाही मार्ग मोकळा झाला आहे. सुधारित संरेखनानुसार पर्यावरण परवानगीसाठी यापूर्वीच प्रस्ताव पाठविण्यात आला असून त्यास लवकरच मान्यता मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे निविदा प्रक्रिया पूर्ण करून येत्या काही महिन्यांतच या महामार्गाच्या कामाला सुरुवात करण्याचे एमएसआरडीसीचे नियोजन आहे. हा महामार्ग सेवेत दाखल झाल्यानंतर नागपूर – चंद्रपूर प्रवास तीन ते साडेतीन तासांऐवजी केवळ दोन तासांत करता येणार आहे.

# जावळीत महिलांनी "शिवज्योत" आणून साजरी केली शिवजयंती

**महाईन्यूज । कुडाळ**

**जावली पंचायत समिती मधिल महिला अधिकारी व महिला कर्मचारी यांनी यावर्षी गटविकास अधिकारी निलेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व सहकाऱ्याने किल्ले अंजिक्यतारा ते जावळी (मेढा ) पंचायत समिती अशी " शिवज्योत" आणून एक आगळा वेगळा उपक्रम राबविला.**



पारंपारिक वेशभुषामध्ये सर्व सहभागी महिलांनी सकाळी ६ वा. किल्ले अजिंक्यतारा गडावर शिवगर्जना करत शिवज्योत प्रज्वलीत करून मेढ्याकडे मार्गक्रमण करण्यात आले. जावळी तालुक्याच्या हद्दीमध्ये शिवज्योतीचे आगमन होताच मोरावळे ते मेढा या मार्गावर स्थानिक ग्रामस्थांनी स्वागत केले. मेढा बाजारपेठे मधून वाद्यांच्या गजरात व फटाकड्यांच्या आतीषबाजीत भव्य मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर पंचायत समितीच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमात स्वागत कऱण्यात आले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळ्याचे व शिव ज्योतीचे पुजन गटविकास अधिकारी निलेश पाटील यांचे हस्ते व मान्यवरांचे उपस्थतितीत करण्यात आले. या प्रसंगी प्रकल्प अधिकारी खामकर मॅडम,माजी जि.प. सदस्य दत्तात्रय पवार, सुरेश पार्टे, नारायण शिंगटे, प्रकाश कदम, वेण्णा विद्यालयाचे प्राचार्य पाटील (सर) व कार्यालयीन कर्मचारी उपस्थितीत होते. मान्यवरांचे हस्ते शिवज्योत आणण्यासाठी विशेष परिश्रम घेणाऱ्या रणरागीनींचा गुलाबपुष्प देवून सत्कार करण्यात आला. पुष्पलता गायकवाड यांनी त्यांच्या सहकारी अधिकारी,कर्मचारी महिला हेमलता येवले, विजया भिलारे, अपर्णा जाधव, सविता सांगडे, शुभांगी कांबळे, अर्चना गंगावणे प्रतिमा कांबळे, कस्तुरी सुर्यवंशी, उषा उंबरकर,निर्मला नावडकर, वैशाली बामणे, देशमाने मॅडम यांच्यासह कार्यालयीन अधिकारी, कर्मचारी यांच्या सहकाऱ्यांने " शिवज्योतीचे" उत्तम नियोजन केले होते. सातारा जिल्ह्यातील हा एकमेव आगळा वेगळा महिलांनी राबवलेला " शिवज्योतीचा "' उपक्रम ठरला आहे. याप्रसंगी विशाल रेळेकर व कु. अन्वी नावडकर यांनी शिवगीतांचे सादरीकरण केले.

# पंतप्रधान निवासाजवळ मोठी कारवाई!

## ३ झोपडपट्ट्यांतील ७१७ घरांना नोटिसा, ६ मार्च अंतिम मुदत

**महाईन्यूज । दिल्ली**

**नवी दिल्लीतील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानाजवळील झोपडपट्ट्या हटवण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. रेसकोर्स रोड परिसरातील तीन झोपडपट्ट्या हटवण्याच्या दिशेने केंद्र सरकारने पाऊल उचलले आहे. गुरुवारी (ता. १९) त्या परिसरातील रहिवाशांना पुनर्वसनाच्या नोटिसा देण्यास सुरुवात करण्यात आली. नोटिसांनुसार रहिवाशांना येत्या ३ मार्चपर्यंत घरे रिकामी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.**

तसेच डूसीब (DUSIB) कॉलनीतील फ्लॅटचा ताबा घेण्यास सांगण्यात आले आहे, अशी माहिती ‘द इंडियन एक्सप्रेस’ला मिळाली आहे.

गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाच्या भू व विकास कार्यालयाने गुरुवारी एका रहिवाशाला नोटीस बजावली. या नोटीसमध्ये रेसकोर्स रोडवरील भाई राम कॅम्प, मस्जिद कॅम्प आणि डीड कॅम्पमधील रहिवाशांना घरे रिकामी करण्यास सांगण्यात आले आहे. घरे रिकामी न केल्यास कायदेशीर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे. ‘द इंडियन एक्सप्रेस’ने पाहिलेल्या नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे की, झुग्गी-झोपडी (JJ) चे हे तीन क्लस्टर भू व विकास कार्यालयाच्या अखत्यारीतील सरकारी जमिनीवर आहेत.



### दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान

२९ ऑक्टोबर २०२५ रोजी सर्व रहिवाशांना पुनर्वसनाबाबत नोटीस बजावण्यात आली. या नोटीसीला नोव्हेंबरमध्ये दिल्ली उच्च न्यायालयामध्ये आव्हान देण्यात आले. १३ नोव्हेंबर २०२५ रोजी दिलेल्या आदेशात न्यायालयाने सरकारकडून उत्तर मागवले आणि स्पष्ट केले की, “दरम्यान, प्रक्रियात्मक सुरक्षा उपायांचे पालन केल्याशिवाय याचिकाकर्त्यांना बेदखल करण्यात येणार नाही.” त्यानंतर १३ जानेवारी रोजी झालेल्या पुढील सुनावणीत सरकारने उत्तर सादर करण्यासाठी आणखी चार आठवड्यांची मुदत मागितली. न्यायालयाने प्रकरण १३ मे रोजी सुनावणीसाठी सूचीबद्ध करण्याचे निर्देश दिले आणि तोपर्यंत १३ नोव्हेंबरचा अंतरिम आदेश लागू राहील, असे स्पष्ट केले.

### झोपडपट्ट्यांचा पत्ता अद्याप ‘रेसकोर्स रोड’च

पंतप्रधानांचे अधिकृत निवासस्थान ‘७, लोक कल्याण मार्ग’ येथे असून ते झोपडपट्ट्यांपासून काही किलोमीटर अंतरावर आहे. नवी दिल्ली महानगरपालिका परिषद (एनडीएमसी) यांनी २०१६ मध्ये ‘रेसकोर्स रोड’ या रस्त्याचे नाव बदलून ‘लोक कल्याण मार्ग’ असे केले. या नामांतरानंतर अधिकृत पत्त्यांमध्ये बदल करण्यात आला असला, तरी सर्व शासकीय नोंदी एकसारख्या अद्ययावत झालेल्या नाहीत. मात्र, भूमी व विकास कार्यालय (एल अँड डीओ) यांच्या अधिकृत नोंदींमध्ये झोपडपट्ट्यांचा पत्ता अद्याप ‘रेसकोर्स रोड’ असाच नमूद आहे.

### २०२४ रोजी झाले होते सर्वेक्षण!

नोटीसामध्ये असेही नमूद करण्यात आले आहे की, दिल्ली अर्बन शेल्टर इम्प्रूव्हमेंट बोर्ड (DUSIB) च्या पुनर्वसन धोरणानुसार रहिवासी पर्यायी घरांसाठी पात्र आहेत की नाही, याची पडताळणी करण्यासाठी जानेवारी २०२४ मध्ये एल अँड डीओ आणि दिल्ली विकास प्राधिकरण (DDA) यांनी संयुक्त सर्वेक्षण केले होते. त्यानंतर तीन क्लस्टर्समधील रहिवाशांचे पुनर्वसन सुमारे ४५ किमी अंतरावर असलेल्या सावदा घेवरा येथील डूसीब कॉलनीत करण्याचा निर्णय घेण्यात आला.

# शिष्यवृत्तीचं आमिष, बंदिवास आणि छळ; एपस्टीन प्रकरणात धक्कादायक खुलासे

**महाईन्यूज । अमेरिका**

**“बंदीवासात ठेवून मानसिक आणि शारीरिक छळ करण्यात आला तसेच, तोंड बंद ठेवण्याची धमकी देण्यात आली”, असा त्रासदायक अनुभव एपस्टीन प्रकरणातील पीडिता रिना ओह यांनी सांगितला. कला विषयात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याचे आमिष दाखवून १९९० साली एपस्टीनने जाळ्यात ओढल्याचे रिना यांनी सांगितले. रिना यांनी डोनाल्ड यांना एपस्टीन प्रकरणाची सगळी माहिती असल्याचा खळबळजनक दावा देखील केला आहे.**



एपस्टीनने माझ्याजवळ अनेक गोष्टींचा खुलासा केला होता. पण, याबाबत कोणाकडे वाच्यता केल्यास शारीरिक त्रास देण्याची धमकी त्याने दिल्याचे रिना यांनी सांगितले. बाहेर जाता येत नव्हते, पैसे नव्हते त्यामुळे मी अडकून पडले होते. अनेक लोक यायचे ते थेट मसाज रुममध्येच प्रवेश करायचे असेही रिना यांनी सांगितले.अँड्र्यू माउंटबॅटन-विंडसरच्या अटकेबाबत बोलताना ही या प्रकरणाची सुरुवात असल्याचे रिना म्हणाल्या. अमेरिकन सरकार जबाबदारी झटकत असल्याचेही त्यांनी नमूद केले. एपस्टीन फाईल्समध्ये नाव आलेल्या प्रत्येकाची चौकशी व्हायला हवी. शपथेवर अनेकांची चौकशी करायला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. या फाईल्समध्ये देशातील अनेक श्रीमंत आणि शक्तीशाली लोकांची नावे आहेत, असाही दावा त्यांनी केला.

डोनाल्ड ट्रम्प यांना नक्कीच अनेक गोष्टी माहिती आहेत. त्यांनी अनेक गोष्टी पाहिल्या आहेत. अनेक गोष्टींचे ते साक्षीदार आहेत. त्यांची शपथेवर चौकशी व्हायला हवी, असे रिना म्हणाल्या. एपस्टीन हा खूप आत्मकेंद्री व्यक्ती होता, असे रिना म्हणाल्या. तिच्या संपर्कातील अनेकांना देखील जाळ्यात ओढल्याचा आरोप रिना यांनी केला आहे. एपस्टीनने माझ्याजवळ अनेक संवेदनशील आणि धक्कादायक गोष्टींचा सविस्तर खुलासा केला होता, पण याबाबत कोणाकडेही वाच्यता केल्यास गंभीर शारीरिक त्रास देण्याची उघड धमकी त्याने दिल्याचे रिना यांनी स्पष्टपणे सांगितले.

### शिष्यवृत्तीचे आमिष

रिना यांनी क्लेषदायक आठवणींना उजाळा देताना एपस्टीनने शैक्षणिक शिष्यवृत्तीचे आमिष दाखवून जाळ्यात ओढल्याचे सांगितले. “कोणत्याही अटींशिवाय मी तुला शिष्यवृत्ती देतो. आणि तुला मला परत भेटावे देखील लागणार नाही. पण, त्यानंतर तो मला भेटण्यासाठी यायला सांगू लागला”, असे रिना म्हणाल्या. भेटण्यास नकार दिल्यानंतर त्याने शिष्यवृत्ती देण्यास नकार दिला. ‘मी अज्ञाधारक नाही’, असे म्हणत त्याने नकार दिल्याचे रिना सांगतात.

### फ्लोरिडात धक्कादायक अनुभव

रिना यांनी फ्लोरिडा येथील अनुभव सांगताना तो आयुष्यातील खराब काळ असल्याचे नमूद केले. ‘मी कुठे आलीये मला कळत नव्हते. देशाच्या या भागात मी पहिल्यांदाच आले होते. इतर मुलीही तिथं होत्या. बाकीच्यांना बाहेर ये-जा करण्याची परवानगी होती पण, माला प्रवासाची परवानगी नव्हती तसेच माझ्याकडे पैसेही नव्हते’, असे रिना सांगतात.

## कल्याणी प्रियदर्शनने दिली हिंट

आपल्याकडे पुरुष कलाकार सुपरहिरो मुख्य भूमिकेत झळकतात. चित्रपटात या गोष्टीला छेद देण्याचे काम २०२५ मध्ये प्रदर्शित झालेल्या लोका चित्रपटाने केले. या चित्रपटात महिला कलाकाराने सुपरहिरोची मुख्य भूमिका साकारली आहे. लोका हा चित्रपट मल्ल्याळम भाषिक असून, तो इतर भाषेत देखील प्रदर्शित करण्यात आला. चित्रपटाला प्रेक्षकांनी चांगला प्रतिसाद दिला. आता या चित्रपटाचा दुसरा भाग येण्यासाठी सज्ज आहे. लोका चित्रपटात सुपरहिरो चंद्राची भूमिका साकारणारी अभिनेत्री कल्याणी प्रियदर्शन हिने एका कार्यक्रमात लोका २ याबाबत हिंट दिली आहे. कल्याणी प्रियदर्शन अलीकडेच एका कार्यक्रमात सहभागी झाली होती. या कार्यक्रमादरम्यान अभिनेत्रीने "लोका २ च्या पटकथेवर काम सुरू आहे. सप्टेंबरमध्ये शूटिंग सुरू होण्याची अपेक्षा आहे. मी चित्रपटाचा एक भाग आहे. कृपया चित्रपटाची वाट पहा." असे सांगितले. लोका हा चित्रपट मल्याळम भाषिक चित्रपट असून चित्रपटाची कथा चंद्राभोवती फिरते. चंद्राकडे अशा काही शक्ती आहेत, ज्यामुळे ती काहीही करू शकते. या शक्तींचा ती चुकीच्या पद्धतीने वापर करत नाही. चित्रपटातील ॲक्शन आणि ड्रामाने प्रेक्षकांना खेळवून ठेवले.



## रिचा चड्ढाचा विश्वासघात

बॉलिवूड अभिनेत्री RICHA CHADHA हिने तिच्या करिअरच्या सुरुवातीला आलेल्या एका कडू अनुभवाबद्दल नुकताच खुलासा केला आहे. आज यशस्वी अभिनेत्री म्हणून ओळख असली तरी सुरुवातीच्या काळात तिला एका अतिशय जवळच्या व्यक्तीकडून धोका मिळाला होता. त्या घटनेमुळे तिचा विश्वास तुटला, पण त्याच वेळी आयुष्यातील मोठा धडा तिला मिळाला.ऋचाने एका मुलाखतीत कोणाचेही नाव न घेता हा अनुभव सांगितला. ती म्हणाली की, "करिअरच्या सुरुवातीला मला कळलं की प्रत्येकजण तुमचं भलं इच्छितो असं नसतं. मी खूप भोळी होते. काही लोकांना तुमच्या यशाची भीती वाटते. त्यांना वाटतं तुम्ही त्यांच्या पुढे जाल किंवा त्यांची स्पॉटलाइट घेऊन जाल." तिच्या मते, जेव्हा एखादी व्यक्ती करिअरच्या सुरुवातीला असते, तेव्हा ती अनेक गोष्टींबाबत नादान असते. अशा वेळी चुकीच्या लोकांवर विश्वास ठेवला जातो. ऋचाने सांगितले की, ज्या व्यक्तीवर ती पूर्ण विश्वास ठेवत होती, त्याच व्यक्तीने तिचा गैरफायदा घेतला. हा अनुभव तिच्यासाठी धक्कादायक होता, पण त्यातूनच तिने स्वतःला अधिक मजबूत बनवले. आज ऋचा चड्ढा आपल्या दमदार अभिनयामुळे इंडस्ट्रीत वेगळी ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरली आहे. तिने अनेक वेगळ्या आणि आशयघन भूमिका साकारल्या आहेत. त्यामुळेच ती नेहमीच स्पष्टवक्तेपणासाठी आणि धाडसी भूमिकांसाठी ओळखली जाते.दरम्यान, ऋचा अलीकडेच एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली होती. मुंबईत तिने फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष EMMANUEL MACRON यांची भेट घेतली. या भेटीत बॉलिवूडमधील अनेक कलाकार उपस्थित होते. स्वतंत्र सिनेमाच्या भविष्यासंदर्भात चर्चा झाली असल्याचे सांगितले जाते. ऋचाने या भेटीबद्दल सोशल मीडियावर आनंद व्यक्त केला. तिने इंस्टाग्रामवर फोटो शेअर करत लिहिले की, "राष्ट्राध्यक्ष महोदय आणि ब्रिजिट मॅक्रॉन यांना भेटून खूप आनंद झाला. स्वतंत्र सिनेमाच्या चांगल्या भविष्यासाठी तुमची रुची कौतुकास्पद आहे." या सर्व घडामोडींमधून एक गोष्ट स्पष्ट होते यशाच्या मार्गावर काटे असतातच. पण त्या अनुभवांतून शिकत पुढे जाणे महत्त्वाचे असते. ऋचा चड्ढाच्या आयुष्यातील हा प्रसंग अनेक नवोदित कलाकारांसाठी प्रेरणादायी ठरू शकतो.



## तृप्तीच्या भूमिकेचे कौतुक

तृप्ती डिमरी ही बॉलीवूडमधील आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक आहे. तिच्या चित्रपटांची चाहते नेहमी मोठ्या आतुरतने वाट पाहत असतात. ॲनिमल चित्रपटातील तिच्या भूमिकेने तिला रातोरात स्टार केले. त्यानंतर तिने अनेक चित्रपटांमध्ये लक्ष वेधून घेणाऱ्या भूमिका साकारल्या. आता तृप्ती ओ रोमिओ चित्रपटात शाहिद कपूरसोबत स्क्रिन शेअर करत आहे. या चित्रपटाला चांगला प्रतिसाद प्रेक्षकांकडून मिळत असून, तृप्तीच्या भूमिकेचे देखील कौतुक होत आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने तृप्तीने एका वृत्तवाहिनीला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिने तिच्या आत्तापर्यंतच्या प्रवासोबतच तिच्या मते प्रेम म्हणजे काय असते? याबद्दल सांगितले. प्रेमाबद्दल प्रत्येकाचा दृष्टिकोन वेगळा असतो. प्रत्येक जण त्याकडे आपापल्या पद्धतीनं पाहतो. मी खऱ्या प्रेमावर विश्वास ठेवते. प्रेम आपल्या प्रत्येकाच्या अंतरंगात असतं. ज्याच्यावर आपण प्रेम करू शकत नाही, त्याच्याबद्दल तिरस्कारही निर्माण होत नाही; कारण प्रेम आणि द्वेष या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, असे मत तृप्तीने मांडले.



# दुष्काळात तेरावा महिना! पाकिस्तानच्या खेळाडूंना ‘द हंड्रेड’मधून मोठा धक्का...

## आयपीएल मालकीच्या चार फ्रँचायझींनी पाकिस्तानी क्रिकेटपटूंवर बोली न लावण्याचा निर्णय

महाईन्यूज । दिल्ली

**पाकिस्तानच्या खेळाडूंना आणखी एक मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. इंग्लंडमधील प्रसिद्ध लीग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या द हंड्रेड लीग स्पर्धेत आता पाकिस्तानचे खेळाडू खेळू शकणार नाहीत. कारण या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संघांचे बहुतांश संघमालक हे भारतीय आहेत. या स्पर्धेला सुरुवात होण्याआधीच मोठा निर्णय घेण्यात आला आहे. द हंड्रेडमधील चार संघ आयपीएल फ्रँचायझींच्या मालकीचे आहेत.**



### ४ फ्रँचायझींची बोली लावण्यास नकार...

- इंग्लंडमधील ‘द हंड्रेड’ लीगमध्ये मोठा निर्णय — आयपीएल मालकीच्या चार फ्रँचायझींनी पाकिस्तानच्या खेळाडूंवर बोली न लावण्याचा निर्धार केला आहे.
- ११-१२ मार्चला लंडनमध्ये होणाऱ्या लिलावात १८ देशांतील सुमारे १००० खेळाडू सहभागी होणार असले तरी पाकिस्तानी क्रिकेटपटूंना संधी मिळेल का याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे.

या चारही संघांनी पाकिस्तानच्या खेळाडूंवर बोली लावण्यास नकार दिला आहे.

द हंड्रेड लीग स्पर्धेत मँचेस्टर सुपर जायंट्स, एमआय लंडन, सदर्न ब्रेव्ह आणि सनरायझर्स लीड्स हे भारतीय संघचालक असलेले संघ आहेत आणि या संघांनी द हंड्रेडसाठी त्यांच्या संघात पाकिस्तानी खेळाडूंचा समावेश करणार नसल्याचा निर्णय घेतला आहे. द हंड्रेड लीग स्पर्धेला येत्या काही दिवसात सुरुवात होणार आहे. त्याआधी खेळाडूंचा लिलाव होणार आहे. या स्पर्धेसाठी दोन दिवस खेळाडूंचा लिलाव होणार आहे. ११ मार्चला महिला खेळाडू आणि १२ मार्चला पुरुष खेळाडूंचा लिलाव होणार आहे. हा लिलाव लंडनमध्ये आयोजित केला जाणार आहे.

माध्यमातील वृत्तानुसार, या लिलावात १८ देशातील एकूण १००० खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे. पण ४ फ्रँचायझी कुठल्याही पाकिस्तानी खेळाडूंवर बोली लावणार नाहीत.

पीटीआयच्या हवाल्याने बीबीसीच्या वृत्तानुसार, इंग्लंड क्रिकेट बोर्डच्या एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, आयपीएल संघ असलेले फ्रँचायझी कुठल्याही पाकिस्तानी खेळाडूवर बोली लावणार नाही. आतापर्यंत पुरुषांच्या द हंड्रेड लीग स्पर्धेत मोहम्मद आमिर, इमाद वसिम, शाहीन आफ्रिदी, शादाब खान आणि हरिस रौफसारखे खेळाडू या स्पर्धेत खेळताना दिसून आले आहेत. पण आता लिलावात आल्यानंतर या खेळाडूंवर कोणता संघ बोली लावणार? पाकिस्तानचे खेळाडू या लीगमध्ये सोल्ड होणार का? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

# सिकंदर रझाने मोडला रोहित शर्माचा मोठा रेकॉर्ड!

महाईन्यूज । दिल्ली



**आयसीसी टी -२० वर्ल्डकप जिंकला २०२६ स्पर्धेत आणखी एक मोठा उलटफेर पाहायला मिळाला आहे. ऑस्ट्रेलियासारख्या बलाढ्य संघाला पराभूत करणाऱ्या झिम्बाब्वेने आणखी एक मोठ्या संघाला धूळ चारली आहे. श्रीलंकेत झालेल्या सामन्यात झिम्बाब्वेने श्रीलंकेला त्यांच्या होम ग्राऊंडवर पराभूत केलं आहे. या सामान्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना श्रीलंकेने १७८ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना झिम्बाब्वेकडून सिकंदर रझाने ४५ धावांची दमदार खेळी केली. या खेळीच्या बळावर त्याची सामनावीर म्हणून निवड करण्यात आली. हा पुरस्कार पटकावताच त्याच्या नावे मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे.**



श्रीलंकेने दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना सिकंदर रझाची बॅट चांगलीच तळपली. त्याने २ चौकार आणि ४ षटकारांचा साहाय्याने २६ चेंडूत ४५ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर त्याला सामनावीर पुरस्कार देण्यात आला. दरम्यान हा पुरस्कार जिंकताच त्याने रोहित शर्माचा रेकॉर्ड मोडून काढला आहे. सिकंदर रझा हा आयसीसीच्या स्पर्धेत कर्णधार म्हणून सामनावीर पुरस्कार पटकावणारा सर्वात वयस्कर खेळाडू ठरला आहे. याआधी हा रेकॉर्ड रोहित शर्माच्या नावावर होता.

रोहित शर्माने वय ३७ वर्षे ३३१ दिवस असताना हा पुरस्कार पटकावला होता. तर सिकंदर रझाने वय ३९ वर्षे आणि ३०१ दिवस असताना हा पुरस्कार पटकावला आहे. या यादीत तिसऱ्या स्थानी देखील रोहित शर्माच्या नावाचा समावेश आहे. रोहित शर्माने वय ३७ वर्षे ५५ दिवस इतकं असताना सामनावीर पुरस्कार पटकावला होता.

या सामन्यात प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या श्रीलंकेने ७ गडी बाद १७८ धावा केल्या होत्या. श्रीलंकेकडून पथूम निसांकाने सर्वाधिक ६२ धावांची खेळी केली. रथनायकेने ४४ धावांची खेळी केली. झिम्बाब्वेला हा सामना जिंकण्यासाठी १७९ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना झिम्बाब्वेकडून ब्रायन बेनेटने नाबाद ६३ धावांची खेळी केली. तर सिकंदर रझाने ४५ धावा केल्या. यासह झिम्बाब्वेला ६ गडी राखून विजय मिळवून दिला.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। शनिवार ।
दि. 21 फेब्रुवारी 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# महापालिकेत गाजला भटक्या कुत्र्यांचा मुद्दा!

## कुत्र्यांच्या हल्ल्यांची धक्कादायक आकडेवारी समोर; प्रशासनावर सदस्यांचा रोष

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकाच्या आज (दि.२०) झालेल्या पहिल्या सर्वसाधारण सभेत भटक्या कुत्र्यांचा प्रश्न चांगलाच गाजला. शहरातील वाढत्या कुत्र्यांच्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर हा मुद्दा सभागृहात जोरदारपणे उपस्थित करण्यात आला.**



भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक राजू मिसाळ यांनी या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी प्रतीकात्मक कुत्रा आयुक्त आणि महापौरांसमोर भेट स्वरूपात ठेवत प्रशासनाचे लक्ष वेधले. निवडणूक प्रचारादरम्यान नागरिकांकडून भटक्या कुत्र्यांमुळे होणाऱ्या त्रासाबाबत अनेक तक्रारी मिळाल्याचे त्यांनी सांगितले. नुकतीच शाळेच्या बसमधून उतरत असताना मुलांवर कुत्र्याने हल्ला केल्याची घटना घडल्याचा उल्लेख करत, “शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळेच हा मुद्दा आज सभागृहात मांडला,” असे राजू मिसाळ यांनी स्पष्ट केले.



सभागृहात सादर करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, गेल्या आठ महिन्यांत सुमारे २० हजारांहून अधिक नागरिकांना कुत्र्यांनी चावा घेतल्याची नोंद आहे. गेल्या दहा वर्षांतील आकडेवारीही चिंताजनक असल्याचे समोर आले आहे.

दरवर्षी वाढत जाणारी ही संख्या प्रशासनासाठी धोक्याची घंटा असल्याचे मत अनेक नगरसेवकांनी व्यक्त केले. कुत्र्यांच्या निर्बंध आणि नियंत्रणासाठी ठोस धोरण आखावे, तसेच तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सभागृहात करण्यात आली. या मुद्द्यावर प्रशासनाकडून कोणती भूमिका घेतली जाते आणि पुढील काळात काय निर्णय होतात, याकडे आता शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

### गेल्या १० वर्षांतील कुत्रा चावण्याच्या घटनांची आकडेवारी :



2016-17 : 10,533
2017-18 : 13,558
2018-19 : 14,842
2019-20 : 12,751
2020-21 : 13,832
2021-22 : 13,892
2022-23 : 18,500
2023-24 : 24,169
2024-25 (ऑक्टोबरपर्यंत) : 28,099

# तिसऱ्या दिवशीही आळंदी कचरा डेपोवरील आग धगधगतीच

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**तिर्थक्षेत्र आळंदी येथील कचरा डेपोला लागलेली आग तिसऱ्या दिवशीही पूर्णपणे आटोक्यात आलेली नसून परिसरात दाट धुराचे साम्राज्य पसरले आहे. या धुरामुळे डेपो परिसरात काम करणारे कर्मचारी तसेच ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.**



डेपोवर कचरा टाकण्यासाठी जाणाऱ्या ट्रॅक्टर व घंटागाड्यांवरील कर्मचाऱ्यांना श्वसनाचा त्रास, डोळे-नाक-घशात जळजळ यांसारख्या तक्रारी जाणवत असल्याची माहिती स्थानिकांकडून दिली जात आहे. कचरा जळताना निर्माण होणाऱ्या विषारी वायूंमुळे दीर्घकालीन आजारांचा धोका संभवतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

विशेषतः उष्णतेच्या दिवसांत वा वारा नसताना धूर जमिनीवरच रेंगाळतो, त्यामुळे स्थानिक हवेची गुणवत्ता अत्यंत खराब होत आहे. हवेत सूक्ष्म कणांचे प्रमाण वाढल्याने फुफ्फुसांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जाते. गेल्या वर्षभरात डेपोवर वारंवार आगी लागल्याच्या घटना घडल्या असून, त्यातून होणाऱ्या प्रदूषणाकडे संबंधित विभागाने पुरेसे लक्ष दिले नसल्याची टीका नागरिकांकडून होत आहे.

या परिसरात संत ज्ञानेश्वर महाराज ज्ञानपीठ उभारण्याची घोषणा यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. मात्र, प्रस्तावित ज्ञानपीठाच्या काही भागांवरही या आगीचा धूर पसरत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे धार्मिक व सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाच्या क्षेत्रावरही परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

### डेपोची दुरवस्था; अहवालाचा अभाव

आगीमुळे डेपोला लावलेले संरक्षक पत्रे जळून खाली पडले आहेत. परिसरातील विद्युत डीपी बंद असून वीजपुरवठा खंडित असल्याचे दिसून येते. गेल्या वर्षभरात लागलेल्या आगींमध्ये नेमके किती नुकसान झाले, याबाबत कोणताही अधिकृत अहवाल जाहीर न झाल्याने प्रशासकीय पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

### सुरक्षा उपाययोजनांची मागणी

कचरा डेपोवरील संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी २४ तास सुरक्षा रक्षक नेमावेत तसेच संपूर्ण परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, अशी मागणी स्थानिक रहिवाशांनी केली आहे. डेपोचे तातडीने आधुनिकीकरण करून आगीच्या घटनांची सखोल चौकशी करावी, अशी मागणीही जोर धरत आहे.

# संस्कारांची शिकवण देत उत्साहात शिवजयंती साजरी

## प्रतिभा महाविद्यालयात मिरवणूक, पोवाडे आणि व्याख्यानातून शिवचरित्राचे प्रेरणादायी दर्शन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी केली. संस्थेचे संस्थापक सचिव दीपक शहा यांचे प्रोत्साहन आणि मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया यांच्या मार्गदर्शनाखाली मोठया संख्येने विद्यार्थ्यांनी मोहननगर परिसरातून शिवज्योत ढोल-लेझीम, ताशांच्या गजरात पारंपरिक वेशभूषा परीधान करून भव्य मिरवणूक काढली. मिरवणूक महाविद्यालयाच्या प्रांगणात आल्यानंतर तिचे भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी “छत्रपती शिवाजी महाराज की जय” च्या घोषणांनी सारा परिसर दुमदुमून गेला.**



शिवरायांच्या भव्य मूर्तीचे पूजन व आरती सोलापूर येथील व्याख्यात्या ॲड. वृषाली इंगळे-पाटील यांच्या समवेत प्राचार्या डॉ. क्षितीजा गांधी, उपप्राचार्या डॉ. जयश्री मुळे, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया, संयोजक डॉ. रोहित आकोलकर, डॉ. अमोल शिंदे, प्रा. सुकलाल कुंभार, प्रा. सुप्रिया गायकवाड, प्रा. ज्योती इंगळे तसेच विद्यार्थी प्रतिनिधी वृषाली लाटे, प्रथमेश गलवाड आदींच्या उपस्थितीत करण्यात आली.

“छत्रपती शिवाजी महाराज आणि आजचा तरुण” या विषयावर व्याख्यात्या ॲड. वृषाली इंगळे-पाटील यांचे व्याख्यान झाले. विद्यार्थ्यांनी ‘स्वराज्याची पहाट’ हे लघुनाट्य, ‘शिवजन्म पाळणा’ नृत्य आणि पोवाड्याचे सादरीकरण विद्यार्थी गौरव कालेकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. श्री गणेश व्यायाम मंडळ, ब्रह्मसिंह गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी मर्दानी खेळांत तलवारबाजी, दांडपट्टाचे सादरीकरण केले.

व्याख्यात्या ॲड. वृषाली इंगळे-पाटील यांनी आपल्या व्याख्यानाच्या प्रारंभी विद्यार्थी व उपस्थितांना —“मी माझ्या आयुष्यात कधीही व्यसन करणार नाही आणि प्रत्येक स्त्रीचा आदर करेन.”ही समुदायिक शपथ दिली . पुढे त्या शिवचरित्रावर भाष्य करताना मुलींना धैर्यशील बनण्याचे आवाहन केले. तसेच आई-वडील, भाऊ यांचा आदर करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. तरुणांना उद्देशून त्या म्हणाल्या की, आई-वडिलांचे नाव खाली जाईल असे कोणतेही कृत्य करू नका . आजच्या युवकांसमोर बेरोजगारी, प्रदूषण यांसारख्या अनेक गंभीर त्या सोडविण्यासाठी राजकारणात




नेतृत्व करावयाचे असेल तर विचार करून पुढे आले पाहीजे . महाराष्ट्रात आज माणूसच माणसाचा शत्रू होत चालला आहे, त्यामुळे माणुसकी जोपासणे आवश्यक आहे. चुकीचा इतिहास सांगितला जात असेल तर त्याविरोधात आवाज उठवायला हवा. शिवचरित्रातील स्वाभिमान , धैर्य , स्त्रीला मातेसमान वागविणे हे गुण आत्मसात करा . हिंदू संस्कृती जपण्याचेही त्यांनी आवाहन केले.

मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया यांनी प्रस्ताविकात सांगितले की, या संस्थेतील विद्यार्थी अभ्यासाबरोबरच सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा, बहीःशाल , एन.एस.एस. आदी कार्यक्रम माध्यमातून स्वतःला घडवत आहेत. अशा उपक्रमांतूनच उद्याचे नेतृत्व घडते. छत्रपती शिवाजी महाराजांचे असे कर्तृत्व व नेतृत्व होते कि पुढील हजारो वर्षे त्यांची जयंती साजरी होत राहील.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी सानिका गाढवे व निहाल बागल यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रथमेश गलवाडे, वृषाली लाटे, विराज काशीद, ओम जगताप, प्रतीक गावडे, जानवी धायगुडे, करिष्मा ठाकरे, अनिकेत जगदाळे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# सर्वांगीण विकास हीच यशाची गुरुकिल्ली : प्राचार्या डॉ. पी. मालती

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**“आजच्या तीव्र स्पर्धेच्या युगात केवळ शैक्षणिक प्रगती पुरेशी नाही. विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्वाच्या सर्व पैलूंकडे लक्ष देऊन स्वतःचा सर्वांगीण विकास साधणे ही काळाची गरज आहे. हाच सर्वांगीण विकास भविष्यातील यशाचा मार्ग प्रशस्त करतो,” असे प्रतिपादन डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. पी. मालती यांनी केले.**



आकुर्डी येथील डी. वाय. पाटील शैक्षणिक संकुलात आयोजित महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाप्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्रमुख वित्तीय अधिकारी बिपिन बिहारी शर्मा, प्रशासकीय अधिष्ठाता डॉ. संदीप सरनोबत, कुलसचिव प्रशांत




भालेराव, ‘स्टुडंट अफेअर्स’च्या प्रमुख डॉ. स्मिता पाटसकर, सांस्कृतिक विभाग प्रतिनिधी डॉ. हनी विल्यम्स व प्रा. आराधना चव्हाण यांच्यासह विद्यार्थी परिषदेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## सांस्कृतिक कार्यक्रमातून सामाजिक संदेश

स्नेहसंमेलनात सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी नृत्य, नाट्य आणि संगीताच्या माध्यमातून आपल्या कलागुणांचे सादरीकरण केले. विविध सादरीकरणांतून विद्यार्थ्यांनी महत्त्वाचे सामाजिक संदेशही दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रेया प्रचंड व प्रज्वल दुधे यांनी केले, तर रियांश सहारे याने उपस्थितांचे आभार मानले.

## गुणवंतांचा गौरव आणि वार्षिकांकाचे प्रकाशन

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्यांनी महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल सादर केला. वर्षभरात शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थी व शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाच्या वार्षिक अंकाचे (मॅगझीन) प्रकाशनही उत्साहात पार पडले. प्रा. दिपाली चौधरी, प्रा. आरती उत्तीकर आणि विद्यार्थी प्रतिनिधींनी हा अंक अत्यंत कल्पकतेने तयार केला आहे.

## मार्गदर्शन आणि नियोजन

या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे चेअरमन सतेज पाटील, विश्वस्त तेजस पाटील, संचालक रियर एडमिरल अमित विक्रम (निवृत्त), प्राचार्या डॉ. पी. मालती आणि डॉ. स्मिता पाटसकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# एस.पी.जी. इंटरनॅशनल स्कूलमध्ये शिवजयंती-मराठी दिनाचा दुहेरी उत्सव...

## ' जय भवानी, जय शिवाजी ' च्या जयघोषाने आणि लेझीमच्या तालाने परिसर दुमदुमला

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**येथील एस.पी.जी. इंटरनॅशनल पब्लिक स्कूल (SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL) मध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती आणि मराठी राजभाषा दिन मोठ्या उत्साहात व दिमाखदार वातावरणात साजरा करण्यात आला. पारंपारिक वेशभूषा, पोवाडे आणि लेझीमच्या निनादाने संपूर्ण शाळा परिसर शिवमय आणि मराठीमय झाला होता.**



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि छत्रपती शिवाजी महाराज व वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी दिलेल्या "जय भवानी! जय शिवाजी!" अशा गगनभेदी घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून मा. पांडुरंग नाना गवळी, मा. सुनीता माई गवळी, मा. स्वप्नील गवळी, मा. कोमल गवळी आणि मा. संकल्प गवळी उपस्थित होते. तसेच लेखा विभागातील एकता जाधव व निशा वाघमारे यांचीही विशेष उपस्थिती लाभली. हा कार्यक्रम मुख्याध्यापक डॉ. प्रवीण गायकवाड, तैसीन मुलाणी व सुप्रिया मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. पारंपारिक पद्धतीने शिवाजी महाराजांचा पाळणा गायन हा सोहळा कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरला. सुंदर सजावट आणि विद्यार्थ्यांच्या सादरीकरणासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

कार्यक्रमाची सांगता राष्ट्रप्रेमाची भावना जागृत करणाऱ्या 'वंदे मातरम्'ने आणि आभार प्रदर्शनाने करण्यात आली. "शिवचरित्राच्या स्मरणाने आणि मराठी भाषेच्या अभिमानाने विद्यार्थी व पालकांमध्ये एक नवी प्रेरणा निर्माण झाली आहे," अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

### विद्यार्थ्यांच्या कलागुणांनी जिंकली मने...

बालगटापासून ते सहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, जिजामाता आणि मावळ्यांची हुबेहूब भूमिका साकारली होती. तिसरी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेली नाटिका, स्फूर्तीदायक पोवाडे आणि भाषणे यांनी उपस्थितांची मने जिंकली. विशेषतः ढोल-ताशांच्या गजरात सादर करण्यात आलेल्या लेझीम पथकाने कार्यक्रमात मोठी रंगत आणली. मराठी दिनाचे औचित्य साधून कुसुमाग्रजांच्या कवितांचे वाचन करून मराठी भाषेचा गौरव करण्यात आला.

# नंदनवन हौसिंग सोसायटी, पिंपरी येथे शिवजयंती उत्साहात साजरी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड उद्यमनगर येथील नंदनवन सोसायटीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त उत्सव समितीच्या वतीने भव्य आणि उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. सोसायटीतील सर्व पुरुष व महिला भगिनींनी एकत्र येत अभिवादन केले व त्यानंतर सामूहिक शिववंदना घेण्यात आली. या प्रसंगी उत्सव समितीचे अध्यक्ष भागवत चौधरी, उपाध्यक्षा शिवाणी म्हैसकर, विजय शेवते,उतळे काका, तेजस्विनीताई उंडे, रेश्मा जरे, निशा कुलकर्णी, स्वातीताई बढे तसेच सोसायटीतील इतर पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.**




कार्यक्रमामध्ये लहान मुलांनी पोवाडा गायन, शिवगर्जना तसेच शिवाजी महाराजांवरील भाषण स्पर्धा सादर केल्या. यासोबतच 'किल्ले ओळखा', 'मावळे ओळखा' यांसारख्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विशेषतः महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत स्टेज सजावट, आकर्षक रांगोळी तसेच शिवपाळणा गायन करून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

आपल्या मनोगतात बोलताना भाई रहीम सय्यद यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन स्वराज्याची स्थापना केली व रयतेचे राज्य निर्माण केले, हे अधोरेखित केले. महाराज कोणत्याही जाती-धर्माच्या विरोधात नव्हते, तर त्यांनी सर्वसमावेशक आणि न्याय्य राज्यकारभार केला, असे सांगत स्वराज्यातील मुस्लिम सेवक व मुस्लिम मावळ्यांच्या योगदानाची माहितीही त्यांनी उपस्थितांना दिली. कार्यक्रम यशस्वी पार पडल्याबद्दल त्यांनी आयोजक व उपस्थित सर्वांचे आभार भाई रहिम एम सय्यद यांनी मानले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सुभाषजी बढे (गुरुजी) यांनी प्रभावीपणे केले.

www.rklgis.org

**RKL GALAXY™ International School**
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

# TEACHERS' HIRING

## WALK-IN INTERVIEW

Hiring teachers for all subjects across Pre-Primary, Primary, and Secondary sections for the academic year 2026–27.

### Walk-In Schedule Timings:

**Saturday, 21st February 2026**
**Timing: 11:00 AM to 4:00 PM**

**Monday to Friday**
**Timing: 2:00 PM to 4:30 PM**

### Venue:

RKL Galaxy International School, Sr. No. 149/5, Opp. Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune – 412105

www.rklgis.org 8698360005

